# ✽ ऋणनिर्देश ✽

शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. पदवी परीक्षेसाठी ''बहिणाबाई चौधरी यांची कविता : एक अभ्यास'' ही प्रबंधिका सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. ही प्रबंधिका लिहून पूर्ण करीत असताना मला ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजते.

या माझ्या संशोधन कार्यासाठी मला अत्यंत तळमळीने मार्गदर्शन करणारे डॉ. रवींद्र ठाकूर यांनी स्वत: वेळेचे कोणतेही बंधन न पाळता वेळोवेळी मार्गदर्शन केले. संशोधन प्रबंधिकेसाठी आवश्यक असणाऱ्या कोणकोणत्या गोष्टीचा अभ्यास केला पाहिजे, विषय कसा मांडला पाहिजे या सर्व गोष्टी आस्थेवाईकपणे समजावून दिल्या. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

प्रबंधिका लिहिताना अडचणी आल्या, पण या अडचणीतून अतिशय समंजसपणे मला वाट दाखविणेचे नि मार्ग काढण्याचे महत्वपूर्ण काम डॉ. विजय सावंत यांनी केले त्याबद्दल त्यांची मी आजन्म ऋणी आहे.

ही प्रबंधिका पूर्ण करत असताना माझे पती श्री. विनोद यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जे सहकार्य केले त्याबद्दल त्यांची मी आभारी आहे. त्याचप्रमाणे माझे कुटुंबीय, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी यांनीही मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. तसेच या प्रबंधासाठी शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर या ग्रंथालयाचेही अनमोल सहकार्य लाभले.

या प्रबंधिकेचे टंकलेखन करण्याचे काम श्री. खाडे यांनी सुबकपणे व वेळेवर केले याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

- उमा केशवराव गायकवाड